सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)**

www.ycmou.ac.in

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

## बी. ए. पदवी शिक्षणक्रम (G01)

## माहितीपुस्तिका

## शैक्षणिक वर्ष- २०२५-२६



## विद्यापीठ गीत

एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना।
चिरंतन ज्ञानाची साधना।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ॥ धृ ॥
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ॥ १ ॥
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ॥ २ ॥
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे।
न्यायनीतीचे पाऊल जिथे भेदाशी ना अडे।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ॥ ३ ॥

**कुसुमाग्रज**

**निर्मिती**
प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२

© २०२५ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

- प्रथम प्रकाशन : जून, २०२५
- अक्षरजुळणी : गुलाब घाटाळ, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
- प्रकाशक : दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२

# बी. ए. पदवी शिक्षणक्रम (G01) : माहितीपुस्तिका

## अनुक्रमणिका


०१. मुक्त विद्यापीठाचा परिचय

१.१ मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे

०२. विद्याशाखेचा परिचय

२.१ विद्याशाखेची उद्दिष्टे

२.२ विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये

०३. शिक्षणक्रमाविषयी

३.१ शिक्षणक्रम संरचना

३.२ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे आणि निष्पत्ती

०४. अध्ययन पद्धती

४.१ श्रेयांक

०५. अभ्यासक्रम संरचना

५.१ प्रथम वर्ष बी.ए. अभ्यासक्रम (प्रवेश पात्रता, कालावधी, माध्यम, शिक्षणक्रम शुल्क, मूल्यमापन)

५.२ द्वितीय वर्ष बी.ए. अभ्यासक्रम (प्रवेश पात्रता, कालावधी, माध्यम, शिक्षणक्रम शुल्क, मूल्यमापन)

५.३. सरळ (थेट) द्वितीय वर्ष बी.ए. अभ्यासक्रम (प्रवेश पात्रता, कालावधी, माध्यम, शिक्षणक्रम शुल्क, मूल्यमापन)

५.४ तृतीय वर्ष बी.ए. अभ्यासक्रम (प्रवेश पात्रता, कालावधी, माध्यम, शिक्षणक्रम शुल्क, मूल्यमापन)

- ५.४.५.१ तृतीय वर्ष बी. ए. सामान्यस्तर
- ५.४.५.२ तृतीय वर्ष बी. ए. विशेषस्तर

०६. नोंदणी प्रक्रिया

०७. शिष्यवृत्ती योजना लागू असलेले विद्यापीठाचे शिक्षणक्रम

०८. ABC-ID / APAAR-ID आणि DEB-ID तयार करण्याविषयीची सूचना

०९. विशेष सूचना / संपर्कासाठी

१०. सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स)

११. विभागीय केंद्रे

१२. परिशिष्टे

परिशिष्ट ०१ : उमेदवार / विद्यार्थी करारनामा

परिशिष्ट ०२ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली

परिशिष्ट ०३ : विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसीचे) मान्यता पत्र (२००४)

परिशिष्ट ०४ : मुक्त विद्यापीठाच्या पदव्या व पदाविकांना समकक्षता व शासनमान्यता यासंदर्भातील महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय

परिशिष्ट ०५: पूर्वतयारीनंतर पदवी प्राप्त केल्यास १० वी / १२ वी समकक्षतेबाबतचा शासन निर्णय

परिशिष्ट ०६: एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश घेता येण्याबाबतचे दूरशिक्षण मंडळाचे ज्ञापन

परिशिष्ट ०७ : विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) 12-B मान्यता पत्र

परिशिष्ट ०८ : विद्यार्थी सहाय्यता आणि विद्यार्थी कल्याण योजना

परिशिष्ट ०९ : अनिवार्य ऑडीट कोर्स - सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधी माहिती

परिशिष्ट १० : सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) पत्र

परिशिष्ट ११ : IBM Certificate program in Generative AI & Prompt Engineering

परिशिष्ट १२: अंतिम परीक्षा : प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

परिशिष्ट १३: शिक्षणक्रमाचे वेळापत्रक — शैक्षणिक वर्ष - २०२५-२६

## ०१. मुक्त विद्यापीठाचा परिचय

'मुक्त विद्यापीठ' ही संकल्पना नवी असून जगभरात तिचा सर्वत्र स्वीकार झाला आहे. विविध कारणांमुळे अनेकांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. ग्रामीण भागांना शैक्षणिक सुविधांचा अभाव असल्यामुळे, तसेच नोकरी - व्यवसायामुळे पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असूनही ज्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते, त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने मुक्त विद्यापीठे कार्यरत झाली आहेत. सन १९६९ मध्ये जगातील पहिले मुक्त विद्यापीठ इंग्लंडमध्ये स्थापन झाले. त्या पाठोपाठ चीन, जपान, कॅनडा, थायलंड, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश अशा अनेक देशांमध्ये मुक्त विद्यापीठे स्थापन झाली असून याद्वारे विविध शिक्षणक्रमांच्या संधी समाजातील इच्छुकांना दिल्या जात आहेत. भारतामध्ये पहिले मुक्त विद्यापीठ सन १९८२ मध्ये हैद्राबाद येथे डॉ. बी. आर. आंबेडकर मुक्त विद्यापीठ (आंध्र प्रदेश मुक्त विद्यापीठ) या नावाने स्थापना झाले. सन १९८५ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ' दिल्ली येथे स्थापन केले. त्यानंतर राजस्थान, बिहार, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, छत्तीसगढ, आसाम, उत्तराखंड, ओरिसा, पंजाब, केरळ या राज्यांत मुक्त विद्यापीठे कार्यरत झाली आहेत.

महाराष्ट्राला सामाजिक, शैक्षणिक परिवर्तन घडवणाऱ्या विचारवंतांची परंपरा लाभलेली आहे. महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी रामानंद तीर्थ यांनी शिक्षणासाठी अमूल्य योगदान दिले आहे. त्यांचा वारसा घेऊन खेड्यापाड्यापर्यंत उच्च शिक्षण पोहोचवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातल्या इतर विद्यापीठांप्रमाणेच दि. १ जुलै १९८९ रोजी महाराष्ट्र शासन विधिमंडळाच्या क्रमांक २०/१९८९ अन्वये मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. आधुनिक महाराष्ट्राचे जनक यशवंतराव चव्हाण यांचे नाव या विद्यापीठास देण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे भारतातले पाचवे आणि महाराष्ट्रातले पहिले मुक्त विद्यापीठ आहे. विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे असून संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. विद्यापीठाच्या ८ विभागीय केंद्रांच्या माध्यमातून महाराष्ट्रभरातील २४०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहाय्यता केंद्र जोडलेली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) कायदा कलम १२ (ब) अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विधीमंडळ आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी विद्यापीठास प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच संशोधन शिक्षणक्रम राबविण्यास अनुमती दिलेली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अनेक नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांचे सदस्य आहे. विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोनवेळा सन्मानित करण्यात आले आहे. नुकतीच नॅक मानांकित 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ देशातील सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठांशी समकक्ष आहे. महाराष्ट्र शासन व शासनाच्या मान्यताप्राप्त असलेल्या सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी संस्था, विविध मंडळे इत्यादींमधील नोकऱ्यांसाठी, नोकरीत बढती मिळण्याकरिता तसेच पुढील शिक्षणासाठी या विद्यापीठाच्या पदव्या इतर विद्यापीठांच्या पदव्यांप्रमाणेच समकक्ष आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्या परीक्षांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी पात्र असल्याचे यापूर्वीच घोषित केले आहे. आजपर्यंत विद्यापीठाचे अनेक विद्यार्थी केंद्रीय तथा राज्य लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

राष्ट्राच्या व राज्याच्या विकास आराखड्यांशी समन्वय साधून, आपल्या विकासविषयक गरजांना अनुरूप विविध शिक्षणक्रम उपलब्ध करून देणे हे मुक्त विद्यापीठांचे ध्येय आहे. तसेच बदलते तंत्रज्ञान व त्या अनुषंगाने बदलणाऱ्या जीवनप्रणालीशी समायोजन साधण्याकरिता समाजाला ज्ञानात्मक आधार पुरविणारे शिक्षणक्रम विकसित करण्यावर मुक्त शिक्षणपध्दतीचा भर आहे. 'आयुष्यभरासाठी शिक्षण', 'काम करता-करता शिक्षण', 'नोकरी व्यवसायाला आधारभूत ठरणारे कौशल्याधिष्ठित शिक्षण' ह्या संकल्पना प्रत्यक्षात आणून अध्ययनशील समाजाच्या जडणघडणीत विद्यापीठ सहभागी आहे.

'ज्ञानगंगा घरोघरी' विद्यापीठाचे ब्रीदवाक्य असून 'लोकविद्यापीठ' होण्याकडे वाटचाल करीत आहे. समाजाच्या तळागाळातील सर्वांपर्यंत गरजेनुसार शिक्षण पोहचविणे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. मुख्यालय, विभागीय केंद्रे, जिल्हा केंद्रे, अभ्यासकेंद्रे, कार्यस्थळ यांच्यामार्फत विद्यापीठाचे विविध शिक्षणक्रम ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागांतील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्याचे या विद्यापीठाचे धोरण असून 'लोकभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त करून दिला पाहिजे' या यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाला अनुसरून हे विद्यापीठ काम करीत आहे.

## १.१ मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे

१. समाजातल्या शेवटच्या स्तरापर्यंत 'ज्ञानगंगा' पोचवून तसेच शहरी, ग्रामीण व मागास भागातील कष्टकरी, गृहिणी व अन्य प्रौढांना त्यांच्या गरजा लक्षात घेऊन सर्वसाधारण पदवी शिक्षण, व्यावसायिक, तांत्रिक व इतर शिक्षण-प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. समाजातील विविध स्तरांमधील ज्ञानात्मक विषमता दूर करण्याचे माध्यम म्हणून कार्य करणे.
२. वय, कालावधी व प्रवेश पात्रतेच्या नियमांचे जोखड दूर करून शिकण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना सहजपणे शिक्षण घेता येईल अशी लवचिक व उपक्रमशील मुक्त शिक्षणपध्दती विकसित करणे.
३. पारंपरिक विद्यापीठातील शिक्षण अपूर्ण राहिलेल्या व्यक्तींना त्यांनी पूर्ण केलेल्या शैक्षणिक भागाचे मूल्य विचारात घेऊन मुक्त विद्यापीठाच्या उपलब्ध शिक्षणक्रमात (Credit Transfer System) व पुढील शिक्षणाच्या वाटा मोकळ्या करणे.
४. अनौपचारिक व निरंतर शिक्षणामार्फत तसेच शैक्षणिक विस्तार सेवांच्या उपक्रमांतून विविध कला-कौशल्यांचा विकास करण्याकरिता गुणात्मक शिक्षण उपलब्ध करून देणे, बदलत्या तंत्रज्ञानाशी समायोजित होण्यासाठी प्रौढांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, भारताच्या आणि विशेषत: महाराष्ट्राच्या कला-परंपरा, सांस्कृतिक संचित आणि सामाजिक प्रबोधनाचा वारसा यांचे जतन व संवर्धन करण्याकरिता तसेच राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तित्वाचा एकत्र विकास साधण्याकरिता विविध शिक्षणक्रम विकसित करणे.
५. केवळ शासकीय अनुदानावर अवलंबून न राहता आपल्या प्रशासकीय खर्चाच्या बाबतीत स्वावलंबी होण्यावर भर देऊन त्याकरिता खाजगी व सामाजिक संस्थांचा वित्तीय सहभाग मिळविणे, तसेच संगणकादी आधुनिक उपकरणांचा प्रभावी उपयोग करून किफायतशीर व गुणवत्ताधिष्ठित कार्यप्रणाली विकसित करणे.

# ०२. विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत मानवी मूल्यांसह मानवनिर्मित कला, भाषा, साहित्य, सर्जनशीलता, तसेच कुटुंबसंस्था, राज्यसंस्था, अर्थसंस्था इ. विविध संस्थांच्या रचना, तत्त्वज्ञान, इतिहास व परंपरांचा अभ्यास केला जातो. २१व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. व्यक्ती विकासावर भर देणे, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी सहाय्यभूत ठरणे व व्यक्तिला प्रगतीपथाकडे नेणे ही या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये आहेत.

## २.१ विद्याशाखेची उद्दिष्टे

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थीकेंद्री शिक्षणक्रम विकसित करणे.
२. मुक्त शिक्षण प्रणालीनुसार लवचिक अध्ययन व अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे.
३. समाजातील अद्याप शिक्षण पोहोचले नाही अशा दुर्लक्षित घटकांपर्यंत शिक्षण पोहचविणे.
४. विद्यार्थ्यांना मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे ज्ञानशाखेतील शिक्षणास प्रोत्साहित करणे.
५. नवज्ञानाधारित समाजनिर्मिती करणे.
६. दूरशिक्षणाद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचून लोकविद्यापीठ घडविणे.

## २.२ विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये

१. जगभरातील विविध संस्कृती, राष्ट्र-राज्यांच्या जडणघडणीचा, परंपरांचा इतिहास इत्यादींचा प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. शिक्षणक्रमांचा समावेश.
२. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी हक्क इत्यादी मूल्ये तसेच पर्यावरणरक्षणादी चळवळी, मानवी विकास निर्देशांक, शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांच्या कार्याचा समावेश.

३. स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा, धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुना-दर्श यांचा अंतर्भाव.
४. जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यासक्रमांमध्ये समावेश.
५. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, गांधी विचारदर्शन, मानवी हक्क, ग्राहक संरक्षण अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.
६. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.
७. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपरिक अभ्यासक्रम.
८. व्यक्तिमत्व विकास आणि व्यावसायिक यशासाठी पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.
९. स्वयं-अध्ययनासाठी लागणाऱ्या नावीन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.
१०. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.
११. स्वयं-अध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, वेबमाध्यमातून मार्गदर्शक सेवा व शैक्षणिक सहाय्य.
१२. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

## ०३. शिक्षणक्रमाविषयी

रोजगार व्यवसायाच्या विविध संधी प्राप्त होण्याकरिता आवश्यक असणारी कौशल्ये संपादित करता यावी या हेतूने या शिक्षणक्रमाची रचना करण्यात आली आहे. तात्विक व उपयोजित अशा दोन्ही दृष्टीने या शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी ठरावेत, या हेतूने अभ्यास-विषयांची मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी बौद्धिक कौशल्ये व व्यावहारिक उपयोगातील पारंगतता यातील परस्परसंबंधाची सांगड हे या शिक्षणक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

### ३.१ शिक्षणक्रम संरचना

शिक्षणक्रमाची संरचना बी. ए. पदवी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांची मांडणी पुढील तीन गटांत करण्यात आली. खालील तीन वर्षांच्या पदवी शिक्षणक्रमात १०८ श्रेयांकांचे अभ्यासक्रम आहेत. सर्व अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक असेल.

| वर्ष | अभ्यासक्रम | श्रेयांक |
|---|---|---|
| प्रथम | अधिष्ठान (६ अभ्यासक्रम) | ३६ |
| द्वितीय | सामान्यस्तर (६ अभ्यासक्रम) | ३६ |
| तृतीय | सामान्यस्तर किंवा विशेषस्तर (६ अभ्यासक्रम) | ३६ |
| | **एकूण** | **१०८** |

- **प्रथम वर्ष: अधिष्ठान अभ्यासक्रम**

साहित्य, कला, समाजशास्त्रे, विज्ञान-तंत्रज्ञान आणि अभ्यास कौशल्ये अशा विविध सहा क्षेत्रांतील महत्त्वाचे सिद्धान्त वा तत्त्वे यांचा आपल्या जीवनव्यवहाराशी असलेला संबंध लक्षात यावा, या दृष्टीने सहा पायाभूत अधिष्ठान अभ्यासक्रमांचा समावेश प्रथम वर्षात करण्यात आला आहे.

- **द्वितीय वर्ष: सामान्यस्तर**

कला, साहित्य, सामाजिकशास्त्रे अशा विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. पदवी शिक्षणक्रमात द्वितीय वर्षासाठी तीन विषय निवडावेत. या तीनही विषयात प्रत्येकी सहा श्रेयांकाचे दोन अभ्यासक्रम याप्रमाणे एकूण ३६ श्रेयांकांचे ६ अभ्यासक्रम असतील.

- **तृतीय वर्ष: विशेष / सामान्यस्तर**

तृतीय वर्षात विशेषस्तर निवडण्याचा पर्याय उपलब्ध आहे. विशेषस्तरावरील अभ्यासक्रमात एकाच विषयाचे सहा अभ्यासक्रम असतील. ज्या विद्यार्थ्यांना विशेषस्तर निवडायचा नसेल अशा विद्यार्थ्यांना सामान्यस्तरावरील २ विषयांचे प्रत्येकी ३ याप्रमाणे एकूण ६ अभ्यासक्रम निवडता येतील.

## ३.२ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे आणि निष्पत्ती

### ३.२.१ मराठी पदवी शिक्षणक्रम (बी.ए.)

- **शिक्षणक्रमाची उद्दिष्टे**
  १. विविध जीवनक्षेत्रातील मराठी भाषेचे उपयोजन स्पष्ट करणे.
  २. मराठी साहित्यातील विविध साहित्यप्रकारांचा कालखंडानुसार अभ्यास करणे.
  ३. विविध साहित्यप्रकारांची निर्मिती व प्रेरणा समजावून घेणे.
  ४. मराठी साहित्यातील निरनिराळ्या साहित्यप्रवाहांचा अभ्यास करणे.
  ५. मराठी भाषेचे व्याकरण व लेखननियम यांचा अभ्यास करणे.
  ६. मराठीतील वैचारिक साहित्याची संकल्पना अभ्यासणे.
  ७. समाजप्रबोधनातील विविध चळवळीचे स्वरूप अभ्यासणे.

- **शिक्षणक्रमाची निष्पत्ती**
  १. विविध जीवनक्षेत्रातील मराठी भाषेचे उपयोजन स्पष्ट करता येते.
  २. मराठी साहित्यातील विविध साहित्यप्रकारांचा कालखंडानुसार अभ्यास करणे सोपे होते.
  ३. विविध साहित्यप्रकारांची निर्मिती व प्रेरणा समजावून घेता येते.
  ४. मराठी साहित्यातील निरनिराळ्या साहित्यप्रवाहांचा अभ्यास करता येतो.
  ५. मराठी भाषेचे व्याकरण व लेखननियम यासह लेखन करता येते.
  ६. मराठीतील वैचारिक साहित्याची संकल्पना अभ्यासता येते.
  ७. समाजप्रबोधनातील विविध चळवळीचे स्वरूप अभ्यासणे शक्य होते.

### ३.२.२ हिंदी स्नातक शिक्षाक्रम (बी. ए.)

- **शिक्षाक्रम के उद्देश**
  १. हिंदी साहित्य के विविध आयामों से परिचित करना।
  २. भाषा के विभिन्न अंगों से परिचित करना।
  ३. अनुवाद के स्वरूप और महत्व से अवगत करना।
  ४. प्रयोजनमूलक हिंदी के माध्यम से रोजगार हेतू कौशल को विकसित करना।
  ५. छात्रों में कविता के प्रति अभिरुचि तथा विश्लेषण की क्षमता विकसित करना।
  ६. छात्रों मे रोजगार का दृष्टिकोण विकसित करना।

- **शिक्षाक्रम के परिणाम**
  १. हिंदी साहित्य के विविध आयामों से परिचित होगा।
  २. भाषा के विभिन्न अंगों से परिचित होगे।
  ३. अनुवाद के स्वरूप और महत्व से अवगत होगे ।
  ४. प्रयोजनमूलक हिंदी के माध्यम से रोजगार उपयोगी कौशल विकसित होगे ।
  ५. छात्रों मे कविता के प्रति अभिरुचि तथा विश्लेषण की क्षमता विकसित होगी ।
  ६. छात्रों मे रोजगार कौशल विकसित होगे।

### ३.२.३ English Degree Program (B.A.)

- **Program Objectives**
  1. To introduce elements of a short story, and enable the learners to understand, analyse and interprete fictional and non-fictional works of literarture.
  2. To aquaint the learners with the development of English literature and European thought.
  3. To introduce the tradition of Indian writing in English, themes, techniques and cultural traditions.
  4. To enable the learners to understand association between scientific thinking and prose writing.
  5. To enable the learners to appreciate and critically analyse poetry and drama from various periods.
  6. To develop effective communication skills, thus foster effective interpersonal interactions skills including various aspects of verbal, non-verbal, written and digital communication.
  7. To understand the grammar of English, the sound system of modern English, and thus enable the learners to identify and classify various aspects of the structure of modern English.

- **Programme Outcomes**
  1. The learners would be equipped with the skills necessary to read, analyse, and appreciate fictional and non-fictional works of arts.
  2. The learners would have a comprehensive understanding of novel reading that encompasses critical analysis, contextual awareness, and personal engagement.
  3. The learners would have an understanding of Indian writing in English that would foster appreciation and analysis of diverse cultural traditions reflected in literature.
  4. The learners would explore drama as a literary form and performance art, from diverse perspectives and cultures reflected in various dramatic traditions.
  5. The learners would be aquainted with the evolution of Romantic, Victorian and Modern poetry that would foster critical thinking and analytical skills in literary studies.
  6. The learners would be equipped with comprehensive skills in English communication across various contexts, preparing them for academic and professional success.
  7. The learners would have an understanding of the structural aspects of Modern English which would develop analytical and communicative skills relevant to the study of English language.

### ३.२.४ इतिहास पदवी शिक्षणक्रम (बी. ए.)

- **शिक्षणक्रमाची उद्दिष्टे**
  १. भारताच्या राजकीय, सामाजिक- सांस्कृतिक, आर्थिक इतिहासाची माहिती देणे.
  २. भारताच्या विविधतेतील एकतेचे आकलन करून देणे.
  ३. भारतातील स्त्री जीवनाची ऐतिहासिक वाटचाल स्पष्ट करणे.
  ४. भारताच्या इतिहासाच्या आकलनाच्या अनुषंगाने आधुनिक जगाच्या इतिहासाचे आकलन करून देणे.
  ५. महाराष्ट्राच्या परिवर्तनाचा इतिहास स्पष्ट करणे.
  ६. ऐतिहासिक आकलनातून वर्तमान समजावून घेण्याची दृष्टी विकसित करणे.

- **शिक्षणक्रमाची निष्पत्ती**
  १. भारताचा राजकीय, सामाजिक- सांस्कृतिक, आर्थिक इतिहास माहिती होते.
  २. भारताच्या विविधतेतील एकतेचे आकलन होते.
  ३. भारतातील स्त्री जीवनाची ऐतिहासिक वाटचाल स्पष्ट करता येते.
  ४. भारताच्या इतिहासाच्या आकलनाच्या अनुषंगाने आधुनिक जगाच्या इतिहासाचे आकलन होते.
  ५. महाराष्ट्राच्या परिवर्तनाचा इतिहास स्पष्ट करता येतो.
  ६. ऐतिहासिक आकलनातून वर्तमान समजावून घेण्याची दृष्टी विकसित होते.

## ३.२.५ मानसशास्त्र पदवी शिक्षणक्रम (बी. ए.)

- **शिक्षणक्रमाची उद्दिष्ट्ये**

१. वेदन आणि संवेदन ही संकल्पना स्पष्ट होवून, भ्रम, विभ्रम निर्मितीचे कारणे समजावून देणे.
२. बालसंगोपन आणि बालविकास समजावून बालकाच्या वाढ व विकासाच्या पैलूविषयी माहिती करून देणे.
३. संप्रेषण, मानवी विनिमय व समायोजनाचे स्वरूप आणि समस्या स्पष्ट करणे.
४. स्व संकल्पना, नैतिक विकास व सामाजिक प्रेरणा या संकल्पना स्पष्ट करण्यास सक्षम करणे.
५. मन:स्वास्थ्यही संकल्पना सविस्तर स्पष्ट करणे.
६. व्यक्तिमत्वाचे स्वरूप, विकासाची प्रक्रिया आणि स्व-संकल्पना स्पष्ट करणे.
७. वैवाहिक समायोजनाची व्याप्ती व तंत्र समजून वैवाहिक समस्यांवर मार्गदर्शन व उपचार याविषयी माहिती करून देणे.
८. संशोधनात व मानसशास्त्रीय प्रयोगात सांख्यकीचे महत्व याविषयी माहिती देणे.

- **शिक्षणक्रमाची निष्पत्ती**

१. वेदन आणि संवेदन या संकल्पना स्पष्ट होतात व भ्रम, विभ्रम निर्मितीचे कारणे समजण्यास सक्षम होतात.
२. बालसंगोपन आणि बालविकास समजून घेवून बालकाच्या वाढ व विकासाचे पैलू माहिती होतात.
३. संप्रेषण, मानवी विनिमय व समायोजनाचे स्वरूप आणि समस्या स्पष्ट करण्यास सक्षम होतात.
४. स्व संकल्पना, नैतिक विकास व सामाजिक प्रेरणा या संकल्पना स्पष्ट करण्यास सक्षम होतात.
५. मन:स्वास्थ्यही संकल्पना स्पष्ट होते.
६. व्यक्तिमत्वाचे स्वरूप, विकासाची प्रक्रिया आणि स्व-संकल्पना यांचे विश्लेषण करता येते.
७. वैवाहिक समायोजनाची व्याप्ती व तंत्र समजून वैवाहिक समस्यांवर मार्गदर्शन व उपचार याविषयी स्पष्टता येते.
८. संशोधनात व मानसशास्त्रीय प्रयोगात सांख्यकीचे महत्व याचे विश्लेषण करण्यास सक्षम होतात.

## ३.२.६ अर्थशास्त्र पदवी शिक्षणक्रम (बी. ए.)

- **शिक्षणक्रमाची उद्दिष्टे**

१. आर्थिक सिद्धांत आणि त्यांच्या तत्त्वांची ओळख करून देणे.
२. आर्थिक विश्लेषण आणि विचार कौशल्ये विकसित करणे.
३. आर्थिक संशोधनासाठी परिमाणात्मक साधनांसह सुसज्ज करणे.
४. अर्थशास्त्र, वित्त, बँकिंग आणि संबंधित क्षेत्रातील संधीसाठी तयार करणे.
५. जागतिक आर्थिक समस्या आणि धोरणांची समज वाढवणे.

- **शिक्षणक्रमाची निष्पत्ती**

१. वास्तविक-जगातील परिस्थितींमध्ये आर्थिक सिद्धांत आणि तत्त्वे लागू करण्यास सक्षम असतील.
२. आर्थिक सांख्यिकीचे प्रभावीपणे विश्लेषण आणि मांडणी करण्यास सक्षम असतील.
३. संख्यात्मक विश्लेषण पद्धती वापरून स्वतंत्र आर्थिक संशोधन करण्यास सक्षम होतील.
४. अर्थशास्त्र, वित्त, बँक आणि संबंधित क्षेत्रामध्ये यशस्वीपणे संधीचा लाभ घेण्यास सक्षम होतील.
५. जागतिक आर्थिक समस्या आणि धोरणात्मक निर्णय समजून घेण्यास आणि मूल्यांकन करण्यास सक्षम असतील.

### ३.२.७ राज्यशास्त्र पदवी शिक्षणक्रम (बी. ए.)

- **शिक्षणक्रमाची उद्दिष्टे**
  १. राज्यशास्त्रातील विविध राजकीय संकल्पना व राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करणे.
  २. भारतीय शासन व्यवस्था व कार्यपद्धतीची माहिती घेणे.
  ३. भारतीय संविधानातील तत्वज्ञान व मुलभूत हक्कांची समीक्षा करणे.
  ४. राजकीय विचारवंतांचे योगदान व कार्याचे टीकात्मक मूल्यमापन करणे.
  ५. शासनाचे विविध धोरणे व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या प्रक्रियेची ओळख करून देणे.
  ६. राजकीय पक्षपद्धती, निवडणुक प्रक्रिया, विधानमंडळे व स्थानिक समस्या इत्यादींचा अभ्यास करणे.
  ७. राज्यशास्त्रातील विविध आव्हाने व निर्माण होणाऱ्या राजकीय, सामाजिक व आर्थिक समस्यांवर उपाय सुचविणे.

- **शिक्षणक्रमाची निष्पत्ती**
  १. राज्यशास्त्रातील विविध राजकीय संकल्पना व राजकीय व्यवस्थेचे आकलन होण्यास मदत होते.
  २. भारतीय शासनव्यवस्था व कार्यपद्धतीची ओळख होते.
  ३. भारतीय संविधानातील तत्वज्ञान व मुलभूत हक्कांची माहिती होते.
  ४. राजकीय विचारवंतांचे योगदान व कार्याचे टीकात्मक मूल्यमापन करता येते.
  ५. शासनाचे विविध धोरणे व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या प्रक्रियेचे विश्लेषण करता येते.
  ६. राजकीय पक्षपद्धती, निवडणुक प्रक्रिया, विधानमंडळे व स्थानिक समस्यांचे निवारण करण्याची क्षमता विकसित होते.
  ७. राज्यशास्त्रातील आव्हाने तसेच राजकीय, सामाजिक व आर्थिक समस्यांवर उपाय सुचवण्याची दृष्टी तयार होते.

### ३.२.८ समाजशास्त्र पदवी (बी. ए.)

- **शिक्षणक्रमाची उद्दिष्टे**
  १. समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना, सिद्धांत स्पष्ट करून सांगणे.
  २. सामाजिक संरचना, सामाजिक संस्था आणि प्रक्रियेचे अध्ययन करणे.
  ३. भारतीय समाजातील विविध घटकांचे मूल्यांकन करणे.
  ४. सामाजिक विचारवंतांच्या योगदानाचे विश्लेषण करणे.
  ५. पारंपारिक समाज आणि आधुनिक समाजाचे तुलनात्मक अध्ययन करणे.
  ६. ग्रामीण, आदिवासी आणि शहरी भागाचे तुलनात्मक अध्ययन करणे.
  ७. लोकसंख्या, पर्यावरण व सामाजिक विचलन इत्यादीं मधील परस्परसंबंध ओळखणे.

- **शिक्षणक्रमाची निष्पत्ती**
  १. समाजशास्त्रातील सिद्धांत स्पष्ट करता येतात.
  २. सामाजिक संरचना, सामाजिक संस्था आणि प्रक्रियेचे अध्ययनाद्वारे मत व्यक्त करता येते.
  ३. भारतीय समाजातील विविध घटकांचे मूल्यांकन करता येते.
  ४. सामाजिक विचारवंतांच्या योगदानाचे विश्लेषण करता येते.
  ५. पारंपारिक आणि आधुनिक समाजातील साम्य आणि भेदाचे तुलनात्मक अध्ययन करता येते.
  ६. ग्रामीण, आदिवासी आणि शहरी भागाची विशेष ओळख होते.
  ७. लोकसंख्या, पर्यावरण व सामाजिक विचलन इत्यादीमधील परस्परसंबंध स्पष्ट होतो.

# ०४. अध्ययन पद्धती

विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही, तसेच अध्ययन करण्यासाठी पूर्ण वेळ देता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केलेली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश असेल - स्वयं-अध्ययनाधिष्ठित पाठ्यपुस्तके, तज्ज्ञ प्राध्यापकांचे संपर्कसत्रात मार्गदर्शन, अध्ययन कालांतर्गत मूल्यमापनाची सोय, आवश्यक तेथे प्रात्यक्षिकांची संधी.

अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता, त्यावरील अध्ययन पुस्तकांचा संचही देण्यात येतो. प्रवेश शुल्कामध्ये निवडक अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. सदर अध्ययन साहित्याची सॉफ्ट कॉपी विद्यापीठाच्या ycmou.ac.in OR ycmou.digitaluniversity.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करावा ही स्वयं अध्ययन पुस्तके अन्य पुस्तकांपेक्षा वेगळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. या पुस्तकांमध्ये एका वाचनात समजावून घेता येईल, अशा प्रकारे विषयांची छोट्या-छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदाहरणार्थ आलेख, चित्रे, उदाहरणे इत्यादींच्या साहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने अशा पुस्तकांची छपाई करण्यात आलेली असते.

पुस्तकात प्रत्येक पृष्ठावर दोन्ही बाजूंना मोठा समास सोडलेला असतो. कोऱ्या जागेत विद्यार्थी ठळक मुद्दे लिहून ठेवू शकतो, त्याला येणाऱ्या शंकांची नोंद करून ठेवू शकतो. अभ्यासविषयाची उजळणी करताना या नोंदींची व टिपणांची त्याला मदत होते. तसेच पाठ्यांशाखाली काही प्रश्न दिलेले असतात, तो भाग वाचून झाल्यावर हे प्रश्न विद्यार्थ्यांने सोडविल्यास तो भाग आपल्याला कितपत समजला ह्याचा त्याला स्वतःलाच पडताळा घेता येतो. जर त्याला काही प्रश्न सोडविता आले नाहीत, तर त्याने तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवायची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळाली नाही तर ते प्रश्न नोंदवून ठेवता येतील व विद्यार्थी सहाय्यता केंद्रावरील संपर्कसत्रात मार्गदर्शक / प्राध्यापक (संमंत्रक - Counsellor) यांच्याशी चर्चा करून त्या प्रश्नांची उत्तरे मिळविता येतील.

विद्यार्थ्यांला आपल्या जवळच्या ठिकाणचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र निवडता येते. विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यतः सुट्टीच्या दिवशी संपर्कसत्रे घेण्यात येतात. या संपर्कसत्रात सबंधित विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक (प्राध्यापक) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. संपर्कसत्रातील मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकांच्या माध्यमातून प्रश्नांची/ शंकांची उत्तरे मिळविणे, कठीण विषयावर आयोजित चर्चा, परिसंवाद यात सहभाग घेणे तसेच अंतर्गत मूल्यमापनातील आपल्या प्रगती विषयी माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी संपर्कसत्रांना उपस्थित राहावे.

विद्यार्थ्यांनी वरील सर्व अध्ययन सुविधांचा जास्तीत-जास्त उपयोग करून घेऊन स्वतःची अभ्यासपद्धती तयार करावी. आपल्याकडे अभ्यासासाठी असलेला वेळ लक्षात घेऊन वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयाचे सुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे, हे चांगल्या अभ्यासपद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे.

## ४.१ श्रेयांक (अभ्यासतासांचे परिमाण)

- मुक्त व दूरस्थ शिक्षणपद्धतीत या अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका' च्या परिमाणात केले जाते. सामान्यतः एका श्रेयाकांसाठी विद्यार्थ्यांला ३० ते ३५ घडयाळी तासांचा वेळ लागतो. एका श्रेयांकाच्या अध्ययनतासाचा अभ्यास म्हणजे पुस्तकांचे वाचन करणे, टिपणे काढणे, चर्चा करणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, ध्वनि-चित्रफिती ऐकणे / पाहणे इत्यादींचा समावेश आहे.
- एक अभ्यासक्रम सामान्यतः ६ श्रेयांकांचा म्हणजेच १८० ते २०० अध्ययनतासांचा असतो. पदवी परीक्षेसाठी एकूण १०८ श्रेयांकांचा अभ्यास पूर्ण करावा लागतो. म्हणजेच पदवीधर होण्यासाठी ३ वर्षात किमान ३२४० तासांचा अभ्यास करणे अभिप्रेत आहे.

# ०५. अभ्यासक्रम संरचना

## ५.१ प्रथम वर्ष बी. ए. अभ्यासक्रम

### ५.१.१. प्रवेश पात्रता (Eligibilty Criteria)

बी. ए. शिक्षणक्रम प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणे आवश्यक –
Fulfilling any one of the following eligibility criteria is mandatory for enrolling into FYBA Program -

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण असावा.
Successful completion of Preparatory Program of Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता बारावी (एच.एस.सी) किंवा इतर राज्यांतील समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.
Statnadrd XII Passed from Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (HSC) or equivalent Board Exmination from other State.

३. १९७५ पूर्वीची माध्यमिक शालांत परीक्षा (११ वी) उत्तीर्ण.
Secondary School Examination (XI) Passed before 1975.

४. एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर सलग किमान २ वर्षे मुदतीचा सरकारमान्य पदविका शिक्षणक्रम उत्तीर्ण - उदाहरणार्थ, डी. एड., डी.सी.ई., डी.एम.ई, डी.ई.ई., डी.फार्म, डेअरी टेक, टी.डी., ए.टी.डी., एन.सी.टी.व्ही.टी., आय.टी आय., एम.सी.व्ही.सी.
Government Recognised Diploma Program of minimum 02 consecutive years after Xth Standard (SSC) Example – D.Ed., D.C.E., D.M.E., D.E.E., D.Pharm., Dairy Tech., T.D., A.T.D., N.C.T.V.T., I.T.I., M.C.V.C. etc.

५. डी.टी. एड. पदविका उत्तीर्ण / Successful completion of D.T.Ed.

### ५.१.२. शिक्षणक्रम कालावधी

UGC Notification of Specification of Degrees, 2014 आणि UGC (ODL Programmes & OL Programmes) Regulations, 2020 **नुसार बी. ए. पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी तो सहा वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार सहा वर्षांचा नोंदणी कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुनर्नोंदणी करता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षणक्रमास पुन्हा नव्याने प्रवेश घ्यावा लागेल.**

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करता-करता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. अभ्यास पूर्ण झालेला नसल्यास वर्षअखेरीस होणारी परीक्षा त्याच वेळेस देण्याची सक्ती नाही. वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोयीने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. प्रथम किंवा द्वितीय वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांत अनुत्तीर्ण असला तरी आपणांस तृतीय वर्षात प्रवेश दिला जातो. मात्र विद्यापीठ नियमाप्रमाणे आपणास परीक्षा अर्ज भरून परीक्षा देता येईल.

### ५.१.३ माध्यम

इंग्रजीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी माध्यम विद्यार्थ्याने निवडलेल्या अध्ययनाच्या भाषेचे राहील. इंग्रजीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्य-पुस्तके, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका या विद्यार्थ्यांने निवड केलेल्या भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी परीक्षा विभागाच्या पूर्वपरवानगीने मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

## ५.१.४ शिक्षणक्रम शुल्क (प्रथम वर्ष बी. ए.)

| अ.क्र | शुल्क तपशील | शुल्क रु. |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक शुल्क | १०४५.०० |
| २. | विद्यार्थी सहाय्यता केंद्र शुल्क | ५५५.०० |
| ३. | परीक्षा शुल्क | १०८०.०० |
| ४. | नोंदणी शुल्क | २००.०० |
| ५. | पात्रता शुल्क | १००.०० |
| ६. | ई-सुविधा शुल्क | ७०.०० |
| ७. | माहितीपुस्तिका शुल्क | ५०.०० |
| ८. | विद्यार्थी कल्याण शुल्क | ५०.०० |
| ९. | क्रीडा शुल्क | ५०.०० |
| १०. | मा. राज्यपाल कार्यालय उपक्रम | ३८.०० |
| ११. | विद्यार्थी विमा योजना शुल्क | २०.०० |
| १२. | ओळखपत्र शुल्क | १०.०० |
| १३. | ग्रंथालय शुल्क | १०.०० |
| १४. | संवाद पत्रिका शुल्क | १०.०० |
| १५. | राष्ट्रीय सेवा योजना शुल्क | १०.०० |
| १६. | आपत्ती व्यवस्थापन शुल्क | १०.०० |
| | **एकूण शुल्क तीन हजार तीनशे आठ रुपये मात्र** | **३३०८.००** |

### ❖ शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना

अर्जदाराने प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे एकत्रित भरणे अनिवार्य आहे. या शुल्कामध्येच अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे शुल्क समाविष्ट आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर कोणतेही वेगळे/ अधिकचे शुल्क देण्याची आवश्यकता नाही. शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार प्रवेश अर्जानंतर दिलेल्या लिंकवरून वरील ऑनलाईन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट/डेबिट कार्ड/युपीआय /नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावयाचे आहे. दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर कुठल्याही लिंकवर भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही. त्यामुळे याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतीक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

### ❖ परीक्षा शुल्क भरण्याबाबतची सूचना

**प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.** विद्यापीठामार्फत परीक्षेपूर्वी परीक्षा-प्रवेश पत्र (Hall Ticket) व परीक्षेविषयीचे सूचनापत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. **मात्र पुनर्परीक्षार्थींना विद्यापीठ नियमाप्रमाणे परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरावे लागेल.** पदवी श्रेणी द्वितीय व तृतीय वर्षाच्या गुणांवर दिली जाईल.

### ५.१.५ बी. ए. प्रथम वर्ष अभ्यासक्रम

| अ.क्र. | अभ्यासक्रम (अनिवार्य) | श्रेयांक | एकूण संपर्कसत्रे |
|---|---|---|---|
| १. | स्वयं-अध्ययन कौशल्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (OPN101) | ०६ | ०६ |
| २. | मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम (MAR101) | ०६ | ०९ |
| ३. | हिंदी व इंग्रजी या भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HEN101) | ०६ | ०९ |
| ४. | सामान्यज्ञान व सामाजिक जाणिवांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (GKN101) | ०६ | ०९ |
| ५. | सामाजिकशास्त्रांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (SOC101) | ०६ | १० |
| ६. | मानव्यविद्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HUM101) | ०६ | ११ |

**टीप :** HEN101 या अभ्यासक्रमातील इंग्रजीसाठी ५ व हिंदीसाठी ४ संपर्कसत्रे निर्धारित केली आहेत.

### ५.१.६ प्रथम वर्ष अभ्यासक्रम आणि अध्ययन साहित्याची यादी

**१. स्वयं-अध्ययन कौशल्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (OPN101)**

पुस्तक १. वाचन व लेखन कौशल्ये
पुस्तक २. संभाषण व श्रवण कौशल्ये
पुस्तक ३. निरीक्षण, ग्रंथालय उपयोजन व स्वयंनिर्देशित अध्ययन

**२. मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम (MAR101)**

पुस्तक १. भाषिक विनिमय : तत्त्व आणि व्यवहार
पुस्तक २. मराठीचा भाषिक वापर : कार्यपुस्तिका
पुस्तक ३. भाषिक सर्जनशीलता : स्वरूप आणि प्रकार पुस्तक
पुस्तक ४. भाषेचा सर्जनशील वापर : कार्यपुस्तिका

**३. हिंदी व इंग्रजी या भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HEN101)**

पुस्तक १. हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना
पुस्तक २. हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना : कार्यपुस्तिका
पुस्तक ३. Foundation Course in English
पुस्तक ४. Foundation Course in English: Work Book

**४. सामान्य ज्ञान व सामाजिक जाणिवांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (GKN101)**

पुस्तक १. विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण आणि आरोग्य
पुस्तक २. विकास संकल्पना आणि मार्ग
पुस्तक ३. संज्ञापन क्रांती आणि जैवतंत्रज्ञान

**५. सामाजिकशास्त्रांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (SOC101)**

पुस्तक १. इतिहास व राज्यशास्त्र
पुस्तक २. समाजशास्त्र व मानसशास्त्र
पुस्तक ३. अर्थशास्त्र व भूगोल

**६. मानव्यविद्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HUM101)**

पुस्तक १. मानव्यविद्या व ललित कलांचा परिचय
पुस्तक २. प्रयोगाधिष्ठित व यंत्राधिष्ठित कला
पुस्तक ३. कार्यपुस्तिका

## ५.१.७ मूल्यमापन प्रक्रिया (बी. ए. प्रथम वर्ष)

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन अंतिम परीक्षा (लेखी परीक्षा – University Assessment – UA) आणि अंतर्गत मूल्यमापन (गृहपाठ - Continuous Assessment – CA) अशा दोन पातळ्यांवर केले जाईल. प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गुणदानाचे स्वरूप अनुक्रमे ८०:२० गुणोत्तरानुसार असेल.

### ❖ अंतर्गत मूल्यमापन

- विद्यार्थ्यांनी ज्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला आहे, त्या वर्षामध्ये गृहपाठ केवळ एकदाच स्वीकारले जातील.
- अंतर्गत मूल्यमापनात प्रत्येक अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ असेल. त्यात प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न असतील. अंतर्गत मुल्यमापनात उत्तीर्ण होण्यासाठी किमान गुण मिळवण्याची अट नसेल.
- अंतर्गत मूल्यमापनात मिळालेले गुण आणि अंतिम परीक्षेत मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील.अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.
- अंतर्गत मूल्यमापनासाठीचे (गृहपाठाचे) प्रश्न विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in OR http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावेत.
- **<u>प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी</u>** गृहपाठ प्रश्नांची उत्तरे लिहिण्याकरिता विद्यापीठाने बारकोड असलेली पृष्ठे पोर्टलवर उपलब्ध करून दिली आहेत. या पृष्ठांची प्रिंट काढून त्यावर स्वहस्ताक्षरात गृहपाठ प्रश्नांची उत्तरे लिहावीत. त्यांचे स्कॅन करून .pdf फाईल पोर्टलवर अपलोड करावी. गृहपाठ अपलोड करण्यासंदर्भातील सविस्तर सूचना खाली दिलेल्या आहेत त्यांचे पालन करावे.
- विद्यापीठाने अंतर्गत मूल्यमापन सादर करण्याबाबत काही बदल केल्यास त्याबाबतच्या सविस्तर सूचना संकेतस्थळावर तसेच आपल्या अभ्यासकेंद्रावर / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर दिल्या जातील.

### ❖ <u>प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी गृहपाठ ऑनलाईन अपलोड करण्याबाबतच्या सूचना</u>

### ❖ <u>विद्यार्थ्यांसाठी सूचना</u>

अंतर्गत मूल्यमापनासाठी विद्यार्थ्यांनी **<u>स्वहस्तलिखित गृहपाठ</u>** (Home Assignment) विद्यापीठाच्या पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य आहे. गृहपाठ अपलोड करताना खालील सूचनांचे पालन करावे.

१. गृहपाठासाठी आपण https://asm.ycmou.org.in/ या पोर्टलवर उपलब्ध असलेले Student User Guide काळजीपूर्वक वाचावे. तसेच आपल्या १६ अंकी कायम नोंदणी क्रमांकाचा (PRN) वापर करून नोंदणी करावी.
२. पोर्टलवर यशस्वीपणे नोंदणी (लॉगीन) केल्यावर आपल्याशी संबंधित अभ्यासक्रमांची संपूर्ण माहिती दिसेल. येथे गृहपाठ लिहिण्यासाठी बारकोड असलेली कोरी पृष्ठे दिलेली आहेत. आवश्यकतेनुसार या पृष्ठांच्या प्रिंट काढून घ्याव्यात आणि त्यावर स्वहस्ताक्षरात गृहपाठ प्रश्नोत्तरे लिहावीत.
३. पाच गुणांच्या प्रश्नाची उत्तरे किमान ५० ते ६० शब्दांत लिहावीत. सर्व उत्तरे मुद्देसूद असावीत. गृहपाठ प्रश्न क्रमवार सोडवावेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहिणे अपेक्षित आहे. प्रश्नाचे उत्तर एका पृष्ठावर बसत नसल्यास

शेवटी कृ.मा.प. / P.T.O. असे लिहावे, तसेच पुढील पृष्ठावर प्रश्न क्रमांक नोंदवून त्यापुढे उर्वरित उत्तर लिहावे. (उदा. Q-1 Continued...)

४. प्रत्येक अभ्यासक्रमाचा गृहपाठ लिहून झाल्यानंतर पृष्ठांच्या क्रमानुसार त्याची .pdf फाइल तयार करावी. तुमची .pdf फाईल सुस्पष्ट स्कॅन केलेली, वाचनीय असावी. स्कॅन करताना कोणतेही पृष्ठ ओव्हरलॅप होणार नाही, वेडेवाकडे, तिरपे किंवा फोल्ड होणार नाही याची काळजी घ्यावी. प्रत्येक पृष्ठाची साईज किमान 3MB आणि सर्व पृष्ठे मिळून फाईलची साईज जास्तीत जास्त 20MB पेक्षा अधिक असू नये.

५. गृहपाठ अपलोड करण्यासाठी https://asm.ycmou.org.in/ या पोर्टलला भेट द्यावी. अपलोड झालेल्या गृहपाठाची प्राथमिक तपासणी अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रामार्फत करण्यात येईल. प्राथमिक तपासणी झाल्यावर पात्र (Approved) ठरलेल्या गृहपाठांचे गुणदान अभ्यासकेंद्र/ सहाय्यता केंद्रावरील संमंत्रकांमार्फत करण्यात येईल.

६. अपलोड केलेली पृष्ठे अवाचनीय असतील, विषयानुसार अपलोड केलेले नसतील, स्कॅन केलेली पृष्ठे वेडीवाकडी, तिरपी किंवा ब्लर झालेली असतील, कोरी पृष्ठे स्कॅन केलेली असतील तर अशा गृहपाठांचे मूल्यमापन केले जाणार नाही. असे गृहपाठ अस्वीकृत (Reject) केले जातील, याची नोंद घ्यावी. गृहपाठ अस्वीकृतीची (Rejection) माहिती विद्यार्थ्यांना आपल्या प्रोफाईलमध्ये पहायला मिळेल.

७. पोर्टलवरील नोंदणी, गृहपाठ अपलोड करण्यापासून ते गृहपाठ तपासणीपर्यंतची (गृहपाठ स्वीकारले किंवा अस्वीकृत (Reject) केले) इत्यादी सर्व माहिती आपल्या प्रोफाईलवर तसेच ई-मेलवर मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले प्रोफाईल आणि इमेल वेळोवेळी तपासणे, तसेच अभ्यासकेंद्राच्या सतत संपर्कात राहणे अपेक्षित आहे.

८. नोंदणी, सादरीकरण (सबमिशन), पुनर्सादरीकरण (रि-सबमिशन) या सर्व प्रक्रिया एका विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करायच्या असतात. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळेनंतर गृहपाठ अपलोड करता येणार नाहीत. निर्धारित कालावधीतच विद्यार्थ्यांनी आपले गृहपाठ अपलोड करणे अनिवार्य आहे.

९. कोणत्याही कारणास्तव अस्वीकृत (Reject) झालेले गृहपाठ विद्यार्थ्यांच्या लॉग-ईनला पुन्हा अपलोड (पुनर्सादरीकरण) करण्यासाठी उपलब्ध होतील. पुनर्सादरीकरणदेखील विहित कालावधीतच पूर्ण करावयाचे आहे. निर्धारित केलेला कालावधी संपुष्टात आल्यावर गृहपाठ अपलोड करता येणार नाही. विद्यार्थ्यांनी याबाबत निष्काळजीपणा केल्यास त्यांच्या गुणपत्रिकेतील अंतर्गत गुण (CA) रकान्यात गैरहजर Absent (Ab) अशी नोंद होईल.

१०. **अत्यंत महत्वाचे :** गृहपाठ लिहिण्यासाठी आपल्याच लॉगीनमध्ये उपलब्ध असलेल्या पृष्ठांचा वापर करावा. आपल्या लॉगीनमधील पृष्ठांवर आपला बारकोड असल्याने, अन्य कोणाच्याही लॉगीनमधील पृष्ठांचा किंवा इतर कोणत्याही पृष्ठांचा वापर केल्यास गृहपाठ अस्वीकृत (Reject) होतील.

## ❖ अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रासाठी सूचना

१. अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रांनी https://asm.ycmou.org.in/ पोर्टलला भेट देऊन, नोंदणी करावी. त्यानंतर लॉगीनमध्ये प्रथम त्यांच्या केंद्रावरील समंत्रकांच्या माहितीची नोंद करावी. अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रांच्या लॉगीनमध्ये किती विद्यार्थ्यांनी गृहपाठ सादर केले आहेत याची माहिती दिसेल. त्यानुसार विद्यार्थ्यांकडून गृहपाठ अपलोड करण्याबाबत पाठपुरावा करावा आणि निर्धारित कालावधीत सर्व विद्यार्थ्यांकडून गृहपाठ अपलोड करून घ्यावेत. याबाबत विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य करावे.

२. अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रानी आपल्या लॉगीनमध्ये आलेल्या गृहपाठाची प्राथमिक तपासणी तातडीने करावी. योग्य गृहपाठाचे संबंधित विषयांच्या समंत्रकांकडून परीक्षण करावे. योग्यप्रकारे अपलोड न झालेले गृहपाठ अस्विकृत करून, ते पुन्हा संबंधित विद्यार्थ्यांकडून लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करावा. अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रांनी परीक्षण / तपासणी प्रक्रिया विद्यापीठाने निर्धारित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

❖ **गृहपाठ ऑनलाईन अपलोड करण्याबाबत काही बदल असल्यास परीक्षा विभागामार्फत तशा सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करण्यात येतील.**

❖ **विद्यार्थी आणि अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रे यांना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास अथवा अधिक माहितीसाठी 8055253072 या भ्रमणध्वनीवर तसेच oasishelpdesk22@gmail.com या ईमेलवर आपण संपर्क करू शकतात.**

### ❖ अंतिम मूल्यमापन

- प्रत्येक वर्षाच्या सहा अभ्यासक्रमांसाठी ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक अभ्यासक्रमात ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे चार प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणाचे पाच उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील.
- प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत (University Assessment - UA) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता अंतर्गत आणि अंतिम मूल्यमापनात १०० पैकी एकत्रित किमान ४० गुण मिळविणे अनिवार्य असेल.
- अंतर्गत मूल्यमापनात मिळालेले गुण आणि अंतिम परीक्षेत मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

## ५.२ द्वितीय वर्ष बी. ए. अभ्यासक्रम

द्वितीय वर्षास मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र असे आठ विषय उपलब्ध आहेत. द्वितीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या आठ विषयांची विभागणी दोन गटांमध्ये करण्यात आलेली आहे. पहिल्या गटातून एक आणि दुसऱ्या गटातून दोन असे एकूण तीन विषय निवडायचे आहेत. एकदा निवडलेले अभ्यासक्रम बदलता येणार नाहीत. प्रवेश निश्चितीनंतर अभ्यासक्रम बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

आपण निवडलेल्या प्रत्येक विषयांचे दोन अभ्यासक्रम, अशा तीन विषयांच्या एकूण सहा अभ्यासक्रमांचे अध्ययन करावयाचे आहे. प्रत्येक अभ्यासक्रम सहा श्रेयांकांचा असून, अशा एकूण सहा अभ्यासक्रमांच्या ३६ श्रेयांकांची अंतिम परीक्षा द्यावयाची आहे. विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ९ संपर्कसत्रे आयोजित करण्यात येतात.

### ५.२.१ प्रवेश पात्रता (Eligibilty Criterion)

बी. ए. शिक्षणक्रम द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी खालील पात्रता पूर्ण असणे आवश्यक असेल.
Eligibility criterion for enrolling into the Second Year of B.A. Degree Program.

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात यापूर्वी प्रथम वर्षास प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.
  All such students who had in the previous year, enrolled into the First Year of B.A. Degree Program of Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

### ५.२.२ कालावधी

मुक्त व दूरस्थ शिक्षण पद्धतीत एका वर्षात करावयाचा अभ्यास विद्यार्थी आपल्या सोयीने ते वर्ष संपल्यानंतरही करू शकतो. म्हणून बी. ए. पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी विद्यार्थ्यास तो आपल्या सोयीने सहा वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. मात्र थेट / सरळ द्वितीय वर्षाला प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणक्रमाचा नोंदणी कालावधी ५ वर्षे इतका राहील.

### ५.२.३ माध्यम

इंग्रजीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी माध्यम विद्यार्थ्यांने निवडलेल्या अध्ययनाच्या भाषेचे राहील. इंग्रजीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्य-पुस्तके, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका या विद्यार्थ्यांने निवड केलेल्या भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी परीक्षा विभागाच्या पूर्वपरवानगीने मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

## ५.२.४ नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणक्रम शुल्क (द्वितीय वर्ष बी. ए.)

| अ. क्र | शुल्क तपशील | शुल्क रु. |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक शुल्क | १५२०.०० |
| २. | विद्यार्थी सहाय्यता केंद्र शुल्क | ६८०.०० |
| ३. | परीक्षा शुल्क | १२६०.०० |
| ४. | नोंदणी शुल्क | २००.०० |
| ५. | ई-सुविधा शुल्क | ७०.०० |
| ६. | माहितीपुस्तिका शुल्क | ५०.०० |
| ७. | विद्यार्थी कल्याण शुल्क | ५०.०० |
| ८. | क्रीडा शुल्क | ५०.०० |
| ९. | मा. राज्यपाल कार्यालय उपक्रम | ३८.०० |
| १०. | विद्यार्थी विमा योजना शुल्क | २०.०० |
| ११. | ग्रंथालय शुल्क | १०.०० |
| १२. | संवाद पत्रिका शुल्क | १०.०० |
| १३. | राष्ट्रीय सेवा योजना शुल्क | १०.०० |
| १४. | आपत्ती व्यवस्थापन शुल्क | १०.०० |
| | **एकूण शुल्क तीन हजार नऊशे अठ्याहत्तर रुपये मात्र** | **३९७८.००** |

❖ **शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना**

अर्जदाराने प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे एकत्रित भरणे अनिवार्य आहे. या शुल्कामध्येच अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे शुल्क समाविष्ट आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर कोणतेही वेगळे/ अधिकचे शुल्क देण्याची आवश्यकता नाही. शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार प्रवेश अर्जानंतर दिलेल्या लिंकवरून वरील ऑनलाईन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट/डेबिट कार्ड/युपीआय /नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावयाचे आहे. दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर कुठल्याही लिंकवर भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही. त्यामुळे याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतीक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

## ५.२.५ विषयनिहाय अभ्यासक्रम

### ❖ गट क्रमांक १: मानव्यविद्यांचे विषय

मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषांपैकी कोणतीही एक भाषा निवडावी.

### ❖ गट क्रमांक २: सामाजिकशास्त्रांचे विषय

(अ) इतिहास, मानसशास्त्र (कोणताही एक विषय निवडावा)

(ब) अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र (कोणताही एक विषय निवडावा)

| | | |
|---|---|---|
| **गट क्रमांक १ : मराठी, हिंदी, इंग्रजी (कोणतीही एक भाषा निवडावी.)** | | |
| **१. मराठी** | MAR210 | वाङ्मय प्रकार (कथा-कादंबरी) |
| | MAR211 | स्वातंत्र्योत्तर वाङ्मय प्रवाह |
| **२. हिंदी** | HIN212 | हिंदी : कथनपरक साहित्य |
| | HIN213 | हिंदी : कथेतर साहित्य |
| **३. English** | ENG214 | How to Read a Short Story |
हा करार विद्यार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, विद्यार्थी / उमेदवार याने ‘Accept’ ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल.

या करारनाम्यात ’उमेदवार’ या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि ’विद्यार्थी’ या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

**उमेदवार असे मान्य व कबूल करितो की,**

१. त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

२. त्याने ही खात्री करून घेतलेली आहे की, त्याने निवडलेल्या शिक्षणक्रमास तो पात्र आहे आणि जर तो माहितीपुस्तिका आणि / किंवा संगणक पडद्यावर उपलब्ध माहितीप्रमाणे अपात्र ठरत असेल तर त्याचा प्रवेश ताबडतोब रद्द करण्यात येईल आणि त्याने विद्यापीठात भरलेले शुल्क त्यास आंशिक किंवा पूर्ण स्वरूपात परत मिळणार नाही.

३. त्याने त्यास अध्ययन साहित्य (पुस्तके) कोणत्या स्वरूपात (छापील पुस्तके, इ-बुक, मोबाईल ॲप, दृकश्राव्य फिती, ध्वनिफिती सीडीवर किंवा इंटरनेटवर उपलब्ध असलेला मजकूर) उपलब्ध होणार आहे याची माहिती माहितीपुस्तिकेच्या संबंधित भागातून मिळविली आहे. आणि सदर स्वरूपात अध्ययन साहित्य उपलब्ध होणार आहे याबाबत त्याचे कोणतेही आक्षेप नाहीत आणि तो यापुढे कधीही अध्ययन साहित्य माहितीपुस्तिकेत दिलेल्या स्वरूपापेक्षा वेगळ्या स्वरूपात मिळण्याची मागणी करणार नाही.

४. तो यचममुवि संदर्भातील कोणतीही तक्रार किंवा इतर कोणतेही निवेदन त्यास सादर करावयाचे असल्यास अशी तक्रार किंवा निवेदन तो यचममुवि मार्फत उपलब्ध असलेल्या संगणकीय प्रणालीचा (युजर आयडी) वापर करून करेल. अशी तक्रार किंवा निवेदन तो तक्रार किंवा निवेदनाचे उद्भवणाऱ्या कारणांच्या दिनांकाच्या तीस दिवसांच्या आत करेल.

५. त्यास हे मान्य व कबूल आहे की, विद्यापीठाला शिक्षणक्रम राबविण्याच्या नियमांमध्ये, धोरणांमध्ये, अध्ययन साहित्यामध्ये, पाठ्यक्रमात बदल करण्याचा अधिकार आहे आणि अशा नियमांमधील, धोरणांमधील, अध्ययन साहित्यामधील, पाठ्यक्रमामधील बदल त्यास बंधनकारक असतील आणि याबाबत त्याची कोणतीही तक्रार असणार नाही.

६. तो शिक्षणक्रमाच्या कालावधीमध्ये विद्यापीठात नोंदविलेल्या त्याच्या भ्रमणध्वनी / मोबाईल क्रमांकात बदल करणार नाही.

७. त्यास हे मान्य व कबूल आहे की, त्याने नोंदणीच्या वेळेस विद्यापीठात सादर केलेल्या माहितीत बदल करणे (फोटोग्राफ, भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, पत्ता, इत्यादीसाठी) योग्य ते शुल्क आकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

८. त्यास हे मान्य व कबूल आहे की, जर विद्यापीठास शासनाकडून (शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसंदर्भात) त्याचे शुल्क प्राप्त झाले नाही तर अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास मज्जाव करण्यात येईल आणि जर परीक्षा दिलेली असेल तर त्याचा निकाल तेव्हापर्यंत राखून ठेवण्यात येईल जेव्हापर्यंत त्याचे शुल्क विद्यापीठास प्राप्त होत नाही.

९. त्यास याचीही कल्पना आहे की, त्याच्याकडून कोणतीही असत्य, अपुरी माहिती दिली गेल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल आणि जर त्यास पदवी किंवा पदविका निर्गमित करण्यात आलेल्या असतील तर अशा प्रकारे असत्य, अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याची पदवी, पदविका रद्दबातल करण्यात येईल.

१०. तो विद्यापीठाचे संकेतस्थळ (https://ycmou.digitaluniversity.ac/ and https://ycmou.ac.in/) येथे नियमितपणे भेट देईल आणि तेथे देण्यात आलेल्या शैक्षणिक किंवा प्रशासकीय स्वरूपाच्या सूचनांचे (उदाहरणार्थ, परीक्षा हॉलतिकीट डाऊनलोड करणे आणि त्याची छपाई करणे) काटेकोरपणे पालन करेल.

११. शिक्षणक्रमाचा अभ्यास परिश्रमपूर्वक, शिस्तबद्ध आणि प्रामाणिकपणे करेल. तसेच आपले वर्तन विद्यापीठाच्या आदर्श विद्यार्थ्याप्रमाणे करेल व अशी कोणतीही कृती करणार नाही की जी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यास शोभणार नाही.

## परिशिष्ट ०१ : Candidate/Student Agreement at the time of Admission

This is an agreement between the student or candidate and the YCMOU which is entered into by virtue of the candidate for admission clicking on '**ACCEPT**' button on the online admission portal at the time of admission to a program using online admission process. '

In this agreement the term "candidate" is used to mean the person who proposes to take admission to a program in YCMOU and the term "student" is used to mean a person who has been admitted to a program of the YCMOU after fulfilling all the conditions thereof.

**The candidate undertakes that –**

1. He has gone through the prospectus and the onscreen narrations or directions and has sincerely responded to the on-screen directions.
2. He has ensured that he is eligible to the program to which he proposes to take admission and that if it is found otherwise, (that is, if he is found not to be fulfilling the conditions of the eligibility at any time as per the rules mentioned in the prospectus or the on-line narrations) his admission will be summarily cancelled and the fees paid to the university will not be refunded in part or in full.
3. The information about the medium/mode of delivery of the Study Material (for example printed books, e-books, mobile app, audio/ video material available on internet or through CD/DVD, etc) has been duly studied by me in the relevant pages of the prospectus and I have no objection to the said mode of delivery. He shall not make any demands on the methods or medium of delivery other than that mentioned in the prospectus.
4. He shall make any representations to the YCMOU by logging on as a student in respect of any activities of grievances within a period of thirty days from the date of cause of the grievances or by an email to the university at the designated e-mail address.
5. He understands that the University reserves right to make changes in the rules or syllabi or learning material or any other policy matter as a matter of urgency and that such changes in the rules, syllabi or policy matters shall be binding and applicable on him and that he shall not make objections to such changes.
6. He shall not change his mobile number as registered with the University during the time of admission to the program.
7. He understands that the University shall levy charges on changes in profiles of the student, including the photograph, mobile number, date of birth, etc.
8. He understands that in case the University does not receive the fees from the Government (in case of Scholarship or Free-ship candidates), the student may be barred from taking examinations and his results shall not be declared till such time that the fees have been received.
9. He understands that any incorrect or incomplete information given by him is liable to cancellation of his admission or withdrawal of degree or diploma awarded to him as and when the university gets to know of such supply of incomplete or incorrect information.
10. He shall visit the University's website (ycmou.ac.in) regularly and undertake necessary steps for academic and administrative purposes as expected from him including downloading of the examination hall ticket and printing the same.
11. He shall undertake studies of the academic program with necessary industry, discipline, honesty and conduct himself with due dignity and shall do nothing which is unbecoming of a student of the YCMOU.

## परिशिष्ट ०२ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली

### १. नाव : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना

### २. व्याप्ती

२.१ सदरची गरीब विद्यार्थी सहाय्य योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एका वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या सर्व शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

२.२ आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू असेल.

### ३. पात्रतेचे निकष

३.१ गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेचा लाभ मिळण्यासाठी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रु. १,००,०००/- राहील.

३.२ तहसिलदाराचे मूळ उत्पन्नाचे प्रमाणपत्र मागील वित्तीय वर्षाचे असावे.

३.३ सदर योजनेचा लाभ देताना संबंधित विद्यार्थी/ विद्यार्थिनी मागील शैक्षणिक वर्षाच्या अंतिम परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

३.४ गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेसाठी विद्यार्थ्याने मागील वर्षी योजनेचा लाभ घेतला असेल तर सदर विद्यार्थी सर्व विषयांत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३.५ सदर योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थिनीने त्याला ज्या शैक्षणिक वर्षासाठी योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला तो अभ्यासक्रम त्याने/ तिने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रातून पूर्ण करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाचे वर्ष पूर्ण होण्यापूर्वी संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश कोणत्याही कारणास्तव रद्द झाल्यास विद्यापीठाने प्रदान केलेली रक्कम व प्रमाणपत्र विद्यापीठास परत करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी, अभ्यासकेंद्र व विभागीय केंद्र यांची राहील.

३.६ राज्य शासन/ केंद्र शासन यांच्याकडे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देय नाही.

३.७ रु. ३,०००/- पेक्षा कमी फी असलेल्या शिक्षणक्रमाकरिता ही योजना लागू नाही.

### ४. योजनेची गुणांची निकष पद्धत

| | |
|---|---|
| ४.१ विद्यार्थी शहरी भागातील असल्यास | १ गुण |
| ४.२ विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्यास | २ गुण |
| ४.३ विद्यार्थी अतिदुर्गम भागातील असल्यास | ३ गुण |
| ४.४ प्रकल्पग्रस्त असल्यास | २ गुण |
| ४.५ खेळाडू असल्यास (विभागीय / राज्य पातळी) | ४ गुण |
| ४.६ उत्पन्न मर्यादा रु. ३५०००/- पर्यंत | ३ गुण |
| ४.७ उत्पन्न मर्यादा रु. ७००००/- पर्यंत | २ गुण |
| ४.८ उत्पन्न मर्यादा रु. १,००,०००/- पर्यंत | १ गुण |

### ५. अनुज्ञेय रक्कम

५.१ अनुज्ञेय रक्कम या योजनेसाठी निश्चित केलेल्या निकषांनुसार प्राप्त गुणांच्या आधारे व शिक्षणक्रम पातळीनिहाय ठरविलेल्या रकमेच्या आधारे निश्चित केली जाईल.

५.२ पदविका शिक्षणक्रम : रु. ३,०००/- किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.३ पदवी शिक्षणक्रम : रु. ५,०००/- किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.४ पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा शिक्षणक्रम : रु. ५,०००/- किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.५ पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम : रु. ७,०००/- किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.६ गरीब विद्यार्थी सहाय्य निधी योजनेकरिता अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकीय तरतूद आरक्षण विभागातर्फे त्या-त्या शैक्षणिक वर्षात करण्यात येईल.

५.७ अनुज्ञेय रक्कम उदाहरण दाखल तक्ता :

| अ. क्र. | किमान गुण | अनुज्ञेय रकमेचे प्रमाण % | डिप्लोमासाठी रक्कम | पदवी/ पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमासाठी रक्कम | पोस्ट ग्रॅज्युएट डिग्रीसाठी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | ३००० | ५००० | ७००० |
| १ | ०२ | ३० | ९०० | १५०० | २१०० |
| २ | ३ ते ५ | ५० | १५०० | २५०० | ३५०० |
| ३ | ६ च्या पुढे | १०० | ३००० | ५००० | ७००० |

## ६. गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेअंतर्गत मदत मिळण्यासाठी अर्ज सादर करण्याची पद्धत

६.१ गरीब विद्यार्थी सहाय्य निधी योजनेचा विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक सहपत्रे जोडून अभ्यासकेंद्राकडे दिलेल्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

६.२ विद्यार्थ्याने सादर केलेल्या विहित नमुन्यातील अर्जावर अभ्यासकेंद्र प्रमुख / संयोजक यांचा सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

६.३ अर्जातील प्रतिज्ञापत्रावर विद्यार्थ्यांची सही व राष्ट्रीयीकृत बँकेचा तपशील म्हणजे बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, आय एफ एस सी (IFSC) कोड या बाबी नोंदवणे आवश्यक आहे.

६.४ मागील वर्षी सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षीच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडली आहे काय तसेच ते मागील वर्षाच्या परीक्षेत उत्तीर्ण आहेत का हे अभ्यासकेंद्र प्रमुखांनी पहावे.

६.५ अभ्यासकेंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांकडून अर्ज निर्धारित मुदतीत भरून घेऊन विभागीय केंद्रांकडे सादर करावेत.

६.६ अभ्यासकेंद्राने विभागीय केंद्राकडे सादर केलेल्या अर्जाची छाननी वरील निकषांच्या आधारे विभागीय केंद्राने करावी. तसेच विद्यापीठाने दिलेल्या विहित नमुन्यातील माहिती Excel Sheet मध्ये भरून हार्ड आणि सॉफ्ट स्वरुपात द्यावी.

६.७ अभ्यासकेंद्रांनी गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेचे अर्ज प्रवेश निश्चितीनंतर लवकरात लवकर विभागीय केंद्रांवर जमा करावेत. विभागीय केंद्रांनी सदर अर्ज तक्त्यातील माहिती सहायक कुलसचिव, नोंदणी कक्ष यांच्याकडे सादर करावेत.

६.८ योजनेचा लाभ मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

# परिशिष्ट ०३ : विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) मान्यतापत्र (२००४)

ज्ञान-विज्ञानं विमुक्तये

विश्वविद्यालय अनुदान आयोग,
बहादुरशाह जाफर मार्ग,
नई दिल्ली-110 002
UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADURSHAH ZAFAR MARG
NEW DELHI-110002

F1-52/2000(CPP-II) 5 MAY 2004

The Registrar / Director
Of all the Indian Universities
(Deemed, State, Central Universities /
Institutions of National importance)

**Subject: Recognition of Degrees awarded by Open Universities.**

Sir/Madam,

There are a number of open Universities in the country offering various degrees/diploma through themode of non-formal education. **The Open Universities have been established in the country by anAct of Parliament or State Legislature in accordance with the provisions contained in Section2(f) of University Grants Commission Act, 1956. These universities are, therefore, empoweredto award degrees in terms of Section 22(1) of the UGC Act, 1956.**

A circular was earlier issued vide UGC letter N.F.1-8/92(CPP) dated February, 1992 mentioning thatthe Certificate, Diplomas and Degrees awarded by Indira Gandhi National Open University are to betreated equivalent to the corresponding awards of the Universities in the country.

Attention is further invited to UGC circular No.F1-25/93(CPP-II) dated 28th July, 1993 (copyenclosed) for recognition of degrees and diplomas as well as transfer of credit for courses successfullycompleted by students between the two types of universities so that the mobility of students fromOpen University stream to traditional Universities is ensured without any difficulty.

The UGC has specified the nomenclature of degrees under Section 22(3) of the UGC Act, 1956 toensure mandatory requirements viz. minimum essential academic inputs required for awarding suchdegrees. A copy of Gazette Notification regarding specification of degrees issued vide No.1-52/97(CPPII)dated 31st January 2004 is enclosed. The details are also given in UGC Website: www.ugc.ac.in

**May, I therefore request you to treat the Degrees / Diploma / Certificates awarded by the Open Universities in conformity with the UGC notification on Specification of Degrees asequivalent to the corresponding awards of the traditional Universities in the country.**

**Yours faithfully**

**(Dr. Mrs. Pankaj Mittal)**
**Joint Secretary.**

**Encl.: As Above**

**Copy to:**

1. The Secretary, Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Secondary Education and Higher Education, Shastri Bhavan, New Delhi-110001.
2. The Secretary, All Indian Council for Technical Education, I.G. Sports Complex, Indraprastha Estate, New Delhi
3. The Secretary, Association of Indian Universities (AIU), 16, Comrade Inderjit Gupta Marg, New Delhi -110002.
4. The Secretary, National Council for Teacher Education, I.G. Stadium, I. P. Estate, New Delhi-110002.
5. The Director of Distance Education Council, IGNOU Campus, Maidan Garhi, New Delhi-110068.
6. The Vice-Chancellor, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi-110068.
7. The Vice-Chancellor, Dr. B. R. Ambedkar Open University, Road, No. 46, Jubilee Hills, Hyderabad (AP)
8. The Vice-Chancellor, Nalanda Open University, West Gandhi Maidan, Patna-800001 (Bihar)
9. The Vice-Chancellor, Dr. Babasaheb Ambedkar Open University, Shahigaug, Ahmedabad-380003 (Gujarat)
10. The Vice-Chancellor, Karnataka State Open University, Manasagangotri, Mysore-570006 (Karnataka)
11. The Vice-Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422222 (Maharashtra)
12. The Vice-Chancellor, Kota Open University, Vardhaman Mahaveer Open University, Kota-324010 (Rajasthan)
13. The Vice-Chancellor, Netaji Subhash Open University, Kolkata-700020 (West Bengal)
14. The Vice-Chancellor, Madhya Pradesh Bhoj (Open) University, Bhopal-462016 (M.P.)

**(V.K. Jaiswal)**
**Under Secretary**

# परिशिष्ट ०४: मुक्त विद्यापीठाच्या पदव्या व पदविकांना समकक्षता व शासनमान्यता यासंदर्भातील महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय

## मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासनमान्यता

**(१) अन्य विद्यापीठांच्या पदवीशी समकक्षता**

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्र क्र. समक (उ. शि.)/१०९४/३२८६१/मवि-१, दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या पत्रान्वये 'केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेली पदवी/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था प्रस्तावित केलेल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) मधील कलम क्र. ३ अन्वये मानीव विद्यापीठे घोषित केली आहेत अशांच्या बाबतीत पदवी किंवा पदविका मान्यता देण्याबाबतचे औपचारिक आदेश विद्यापीठाने काढण्याची आवश्यकता नाही'.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने अधिनियमाद्वारे (कायदा क्र. २०/१९८९) स्थापन केलेले विद्यापीठ असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचीही मान्यता आहे. **त्यामुळे या विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.**

**(२ (विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता**

**अनुदान आयोगाची मान्यता**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F/S-15/89 (CPP-I) दि. ८ डिसेंबर १९९२ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील कलम १२-बी अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मान्यता दिली आहे.

**(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता**

उपसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्र क्र. १४७७ (१७/१९९४/कक्ष) **दि. १७ फेब्रुवारी १९९४ च्या पत्रातील मान्यतेसंबंधीचा मजकूर - 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे संविधिमान्य (Statutory) असल्यामुळे आपल्या विद्यापीठाच्या पदवीधर विद्यार्थ्यांकडून आलेले अर्ज देखील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीधर उमेदवारांकडून आलेल्या अर्जांप्रमाणेच आयोगाकडून विचारात घेतले जातील.**

## मुक्त विद्यापीठाच्या पदवी पदविकांना/ महाराष्ट्र शासन मान्यता

**विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली विद्यापीठे राज्य सेवेतील पदासांठी पदवी/पदविकास मान्यता**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

शासन निर्णय : क्रमांक आरजीडी-१३९४/प्र.क्र. २१/९४/१३,मंत्रालय, मुंबई४०००३२, दिनांक ८ मार्च १९९५

वाचा : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरजीडी-१०६१/१८९६७/११४ - जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९

शासन निर्णय :

महाराष्ट्र लोक सेवा आयोगाशी विचार विनिमय करून उपरोक्त दिनांक २१ ऑगस्ट १९६९ च्या आदेशाद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, केंद्र अथवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापित झालेली विद्यापीठे, संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्था, किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गत भाग ३ अन्वये जाहीर झालेली मानवी विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका तसेच भारतीय वैद्यकीय मंडळ अधिनियम, १९५६ च्या परिशिष्टांध्ये अंतर्भूत केलेल्या वैद्यकीय व संलग्न विषयामधील पदव्या यांना शासकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदे वगळता, राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी आपोआप मान्यता प्राप्त झाली असल्याचे समजण्यात यावे.

(२) सदर आदेशासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या वैधानिक विद्यापीठे व संस्थांची यादी जोडण्यात आली होती. आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे व संस्था यांची अद्ययावत यादी आता या आदेशासोबत जोडण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी - १०६१/१८९६७/ ९१४/जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९ मध्ये नमूद केलेल्या आणि वर परिच्छद १ मध्ये उद्धृत केलेल्या हेतूसाठी सदर सर्व विद्यापीठे/संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना आपोआप मान्यता देण्यात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दा. र. राणे**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति, (१) राज्यपालांचे सचिव

(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव

(३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

(४) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई

(५) महालेखापाल, महाराष्ट्र -२, मुंबई

(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

(७) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई

(८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई

(९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई

(१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

(११) सर्व मंत्रालयीन शिक्षण

(१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख

(१३) अवर सचिव, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली

(१४) निवड नस्ती

**वाचा: महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णय : क्रमांक आरमंत्रालय १३/९४/२१.क्र.प्र/१३९४ .डी.जी., मुंबई मार्च दिनांक ८ च्यासोबत जोडलेल्या यादीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र १९९५ मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अनुक्रमांक १४६ वर नोंद करण्यात आलेली आहे.**

# परिशिष्ट ०५ : पूर्वतयारीनंतर पदवी प्राप्त केल्यास १० वी/ १२ वी समकक्षतेबाबतचा शासन निर्णय

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व
राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांची
प्रमाणपत्रे शासनसेवेसाठी समकक्ष म्हणून विचारात घेण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/१३,**
**मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०००३२**
**दिनांक : २० मे, २०११.**

**वाचा:**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी-१३९८/प्र.क्र.६७/९८/१३, दिनांक १० डिसेंबर, १९९८.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी-१३०५/प्र.क्र.२४/२००५/१३, दिनांक १२ डिसेंबर, २००६.

**शासन निर्णय :**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याबाबत सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्याचे निदेश मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई यांनी श्री. राजेंद्र घुणकीकर विरुद्ध महाराष्ट्र शासन (मूळ अर्ज क्र. ६७०/२००८) वर दिले आहेत. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. ''ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमात १० वी/१२ वी (माध्यमिक/उच्च माध्यमिक) परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहित केलेली असेल त्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला वा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा.''

२. बृहन्मुंबईतील लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमातील २ (इ) मध्ये ''महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत असल्याचे नमूद केले आहे.'' तसेच, उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणेही आवश्यक आहे.राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान, नवी दिल्ली या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेल्या एका उमेदवाराने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारणाकडे दाखल केलेल्या प्रकरणात (मूळ अर्जक्रमांक २०४/२०१०) राज्य शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे आदेश दिले आहेत. केंद्रशासनाने कायद्यान्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institution of Open Schooling, New Delhi) या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा (किमान ५ विषयांसह) उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना शालेय शिक्षण विभागाने अकरावी प्रवेशासाठी पात्र ठरविले आहे. मात्र, शासन सेवेतील नियुक्तीसंदर्भात समकक्षतेबाबत कोणतेही आदेश नाहीत. केंद्रिय मनुष्यबळ विकासमंत्रालयाने सर्व राज्यांना, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institution of Open Schooling, New Delhi)यांच्याकडून दिली जाणारी प्रमाणपत्रे उच्च शिक्षण व नोकरीसाठी (Employment) ग्राह्य (समकक्ष) धरण्याबाबत कळविले आहे. ही बाब विचारात घेऊन, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत माध्यमिक शालांत परीक्षेबाबत दिलेले प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परीक्षा अशी अर्हता असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. ''राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली यांची (मराठी व इंग्रजीसह किमान ५ विषयांसह) शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर प्रमाणपत्र (Secondary School Examination Certificate) धारण करणाऱ्या उमेदवारांनी, राज्य शासन सेवेमध्ये ज्या ज्या ठिकाणी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी अर्हता विहित केली असेल त्या त्या ठिकाणी शासन सेवेसाठी शालांत परीक्षा समकक्ष पात्रता आपोआप धारण केली आहे असे समजण्यात यावे.''

३. त्यानुसार, सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी. हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०५२०१३५१०४००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(बा. वि. निकम)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट ०६: एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश घेता येण्याबाबतचे दूरशिक्षण मंडळाचे ज्ञापन

**DISTANCE EDUCATION COUNCIL**
**INDIRA GANDHI NATIONAL OPEN UNIVERSITY**

15983–16229

F.No.DEC/Notification/40.5.1.5/2012
Dated:01.11.2012

**NOTIFICATION**

**Sub: Policy on pursuing two or more programmes simultaneously in various combinations - regarding.**

The Distance Education Council in its 40th meeting held on 08.06.2012 has decided on the policy on pursuing two or more programmes simultaneously in various combinations. Two degree programmes cannot be allowed to be pursued simultaneously. However, a student can pursue two programmes simultaneously through distance or combination of distance and regular modes from the same or different University(ies)/ Institution(s) in various combinations, *viz.*,

1. One Degree and one Diploma/Post Graduate Diploma/Certificate
2. One Post Graduate Diploma and one Diploma/Certificate
3. One Diploma and one Certificate
4. Two Post Graduate Diplomas
5. Two Diplomas
6. Two Certificates

This is for information and adherence by all concerned.

**(DIRECTOR)**

**To**

**VCs of all SOUs/ Heads of DEIs**

3. **The Registrar**
**YCMOU**
**Dnynagangotri, Near Gangapur Dam**
**Nashik-422 222,**
**MAHARASHTRA**

## परिशिष्ट ०७: विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) मान्यता पत्र

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG
NEW DELHI-110002.

NO. F.5-15/89 (OPP-I) December, 1992

The Secretary
Govt. of Maharashtra
*Higher and Technical*
Education and Employment Deptt.
*Mantralaya Annexe*
Bombay- 400032

**Sub : Recognition of Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik *for Central assistance under Section* 12-B *of the* UGC Act, 1956.**

Sir,

With reference to the correspondence resting with your letter No. MOJ/ 63003 (241/92) UNI dated 11th November, 1992 on the above subject, I am to say that the University Grants Commission has agreed to declare the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Nashik established under Maharashtra State Act No. XX of 1989, fit to receive Central assistance for all purposes including Institutional development in terms of the rules framed under Section 12-B of the UGC Act, 1956.

The receipt of the letter may please be acknowledged.

Yours faithfully,

Sd/xxx
(I J GUPTA)
JOINT SECRETARY

*Copy to:* -

1. The Vice – Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422005.
2. Secretary to the Govt. of India, Ministry of Human Resource Development (Deptt. of Education) New Delhi.
3. The Registrar, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi- 110068.
4. The Secretary, Association of Indian Universities, 16, Kotla Marg, New Delhi- 110002.
5. *Desk Officer (Meeting) / S.O FD-III/S.O.SU-II/S.S.O.-I, Stat, U.G.C. New Delhi.*
6. All Officers /Sections, UGC New Delhi.

Sd/-
(D. D. Mehta)
SECTION OFFICER

## परिशिष्ट ०८ : विद्यार्थी सहाय्यता आणि विद्यार्थी कल्याण योजना

- **विद्यार्थी सहाय्यता**

  अल्प उत्पन्न गटातल्या हुशार विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी सहाय्य योजना विद्यापीठातर्फे राबविली जाते. त्यासाठी विद्यापीठाने १५ लाखांची तरतूद केली आहे. या योजनेखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमासाठी असलेल्या शुल्कात सवलत देण्यात येते. त्यासाठी विद्यापीठाने विहित नमुना विकसित केला असून योग्य पात्रताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्कात सवलत देण्यात येते.

- **विद्यार्थी कल्याण योजना**

  विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी दरवर्षी क्रीडा व युवक महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. आंतरविद्यापीठीय महोत्सवातही मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना भाग घेता येतो.

- **क्रीडा महोत्सव**

  विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना खेळाचे मैदान मिळावे म्हणून विद्यापीठाने विभागीय व विद्यापीठ पातळीवर क्रीडा स्पर्धा सुरू केल्या आहेत. यातून खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत भाग घेता येतो. मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या आंतरविद्यापीठीय अश्वमेध व ए. आय. यू. च्या क्रीडास्पर्धेतही खेळाडूंना भाग घेता येतो.

- **युवक महोत्सव**

  विद्यापीठाच्या कलावंत विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करता यावे म्हणून विद्यापीठाने विभागीय व केंद्रीय स्तरावर युवक महोत्सव सुरू केला आहे. यात वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका, नृत्य संगीत, गायन यांसारख्या स्पर्धा घेण्यात येतात. मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या इंद्रधनुष्य व ए.आय.यू. (भारतीय विद्यापीठ संघ) यांच्यातर्फे घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवात कलावंत विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो.

- **आविष्कार संशोधन महोत्सव**

  विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांमधील संशोधन प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी मा. राज्यपाल यांच्या कार्यालयातर्फे दरवर्षी 'आविष्कार' ही संशोधनात्मक स्पर्धा घेण्यात येते. या आंतरविद्यापीठीय संशोधन महोत्सवातही मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना भाग घेता येतो.

- **संवाद पत्रिका**

  विद्यापीठाच्या राज्यभर पसरलेल्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्यासाठी मुक्त विद्यापीठ संवादपत्रिका हे मासिक प्रकाशित केले जाते. विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती, लेख, सूचना यांचा यात समावेश असतो. अभ्यासाची प्रेरणा व दूरशिक्षणाबाबत जागरूकता वाढविण्याचे कार्य ही पत्रिका करते. संवादपत्रिका विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

- **राष्ट्रीय सेवा योजना**

  पारंपरिक विद्यापीठांप्रमाणेच मुक्त विद्यापीठाच्या १५०० विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली आहे.

- **शिक्षणक्रम शुल्कात सवलत**

  आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे पाल्य, अंध आणि तृतीयपंथी विद्यार्थ्यांना रु. २००/- इतके नाममात्र शिक्षणक्रम शुल्क असेल. तसेच विद्यापीठातील नियमित वेतनश्रेणीत कार्यरत सेवक व त्यांचे परिवारजन (स्वतः, पत्नी / पती, दोन पेक्षा अधिक नाही इतके अवलंबून असलेले अपत्य) यांना शिक्षणक्रम शुल्कात विद्यापीठ नियमानुसार सवलत असेल.

## परिशिष्ट ०९ : अनिवार्य ऑडीट कोर्स - सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधी माहिती


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_sol@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191
ऑनलाईन शिक्षण विद्याशाखा / School of Online Learning


SOL/2024/386 दि.: १८.१२.२०२४

### सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा हा अनिवार्य अभ्यासक्रम लागू केला आहे.

**अभ्यासक्रमाची संरचना :** सायबर सुरक्षा अभ्यासक्रम हा एक ऑडीट कोर्स असून त्यासाठी श्रेयांक नसले तरी पदवी व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणक्रमांना अनिवार्य करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम MOOC (Massive Open Online Course) Yashex या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर (https://yashex.mkcl.org/#/) मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी मूळ शिक्षणक्रम पूर्ण करण्यापूर्वी सायबर सुरक्षा अभ्यासक्रम उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्यानंतर त्याचे स्वतंत्र प्रमाणपत्र देण्यात येईल. **सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ शिक्षणक्रमाचे प्रमाणपत्र मिळेल. (प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रमांना हा अभ्यासक्रम लागू नाही.)**

**कालावधी :** सायबर सुरक्षा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी पदवी स्तरावरील शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता ०३ वर्ष तर पदवी शिक्षणक्रमाच्या थेट द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता ०२ वर्ष कालावधी तसेच एक वर्ष शिक्षणक्रम कालावधी असणाऱ्या शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम ०१ वर्षात पूर्ण करणे अपेक्षित आहे. पदव्युत्तर पदवी स्तरावरील शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी ०२ वर्षाचा कालावधी असेल.

**शुल्क :** रु. ५००/- विद्यार्थ्याने एकदा शुल्क भरल्यानंतर उत्तीर्ण होईपर्यंत सदर शुल्क पुन्हा अदा करण्याची आवश्यकता नाही. **(सदरचे शुल्क प्रवेश घेतलेल्या मूळ शिक्षणक्रमाच्या व्यतिरिक्त असेल.)**

**नोंदणी :** खालील लिंकद्वारे YCMOU Student मोबाईल ॲप डाउनलोड करून आवश्यक माहिती भरून अभ्यासक्रमाचे शुल्क अदा करावे.

| SR. No. | Mobile OS | Mobile App Link |
|---|---|---|
| 1. | Android | https://play.google.com/store/apps/details?id=org.mkcl.ycmoudu |
| 2. | iOS | https://apps.apple.com/in/app/ycmou-student/id6475083272 |

**अध्ययन पद्धती :** YCMOU Student मोबाईल ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन उपलब्ध असलेले अध्ययन साहित्य आणि दृकश्राव्य व्याख्यानांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांनी आपल्या सोयीप्रमाणे स्वयं-अध्ययन पद्धतीने अभ्यासक्रम पूर्ण करावा.

**मूल्यमापन :** अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर Yashex या ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे ऑनलाईन परीक्षा द्यावी.

**परीक्षेचे स्वरूप :** ऑनलाईन – बहुपर्यायी प्रश्न [Multiple Choice Question (MCQ)]

**प्रा. माधव पळशीकर**
संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा

**मानद प्रा. कविता साळुंके**
संचालक, ऑनलाईन शिक्षण विद्याशाखा

## परिशिष्ट १० : सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) पत्र

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

प्रो. रजनीश जैन
सचिव
**Prof. Rajnish Jain**
**Secretary**

सत्यमेव जयते

विश्वविद्यालय अनुदान आयोग
**University Grants Commission**
(शिक्षा मंत्रालय, भारत सरकार)
(Ministry of Education, Govt. of India)
बहादुरशाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
Ph.: 011-23236288/23239337
Fax : 011-2323 8858
E-mail : secy.ugc@nic.in

**D.O.No.F.1-42/2022(e.Gov)** **17th October, 2022**

**Subject: Regarding the implementation of Syllabus of Cyber Security Course at Undergraduate and Post Graduate level.**

Respected Madam/Sir,

On the occasion of Cyber Jaagrookta Diwas, 06th October, 2022, the University Grants Commission (UGC) launched the Syllabus of Cyber Security Course at Undergraduate and Post Graduate levels **(https://www.ugc.ac.in/e-book/Cyber_Security/mobile/index.html).**

The syllabus aims to create more aware, responsive and responsible digital citizens, thereby contributing effectively to an overall healthy cyber security posture and ecosystem.

In view of the importance of cyber security and for propagating cyber hygiene amongst HEIs, you are requested to take necessary steps for implementation of the Syllabus of Cyber Security Course at Undergraduate and Post Graduate level in all the streams of your esteemed University and also in the affiliated/constituent Colleges.

With kind regards.

Yours sincerely,

**(Rajnish Jain)**

To

- **The Vice-Chancellors of all Universities**
- **The Principals of all Colleges**

## परिशिष्ट ११: IBM Certificate program in Generative AI & Prompt Engineering


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_sol@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191

स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशन / School of Digital Education


SODE/2025/

Date: 14/06/2025

### (C126)-IBM Certificate Program in Generative AI & Prompt Engineering - B. Arts

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढावी या उद्देशाने 'C126-IBM Certificate Program in Generative AI & Prompt Engineering - B. Arts' हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम अभ्यासण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

**शिक्षणक्रमाची संरचना :**

'C126 -IBM Certificate Program in Generative AI & Prompt Engineering - B. Arts' हा ०२ श्रेयांकांचा अतिरिक्त शिक्षणक्रम (ॲड-ऑन कोर्स) असून विद्यापीठाच्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर मराठी भाषेमध्ये उपलब्ध आहे. सदर शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र प्रमाणपत्र मिळेल. या अभ्यासक्रमाअंतर्गत जनरेटिव्ह AI, प्रॉम्प्ट डिझाइन, डेटा विश्लेषण, AI आधारित स्वयंचलन (Automation) आणि भाषांतर यांसारखी रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करता येतील. आपल्याला ही कौशल्ये पत्रकारिता, जनसंपर्क, भाषाशास्त्र व डिजिटल माध्यमांतील संधी मिळवण्याकरिता सक्षम करतील.

| | |
|---|---|
| **नोंदणी प्रक्रिया** | वर्षभर सुरू |
| **श्रेयांक** | ०२ |
| **अभ्यासक्रमाचा एकूण वेळ** | **६० तास** |
| **अभ्यास पद्धत** | ऑनलाईन स्वयंगतीने, स्वयं-अभ्यासाच्या स्वरूपात<br>(ई-ट्युटोरियल व्हिडिओ, वाचन साहित्य, स्वयंमूल्यांकन व प्रात्यक्षिक प्रकल्पांचा समावेश) |
| **माध्यम** | मराठी |
| **प्रमाणपत्र** | IBM प्रमाणित आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) कडून मान्यता प्राप्त |
| **प्रमाणपत्राचे स्वरूप** | डिजिटल |
| **पूर्ण करण्याची कमाल मुदत** | विद्यार्थ्यांचे खाते (अकाउंट) सक्रीय झाल्यापासून ६ महिने / १८० दिवस |
| **एकूण शुल्क** | **१२९०/- रुपये मात्र (सदरचे शुल्क प्रवेश घेतलेल्या मूळ शिक्षणक्रमाच्या व्यतिरिक्त असेल.)** |
| **ऑनलाईन प्लॅटफॉर्म** | https://yashex.mkcl.org/#/ |
| **लॉगिन आयडी** | विद्यापीठाकडून मिळालेला PRN हाच IBM अभ्यासक्रमासाठीचा लॉगिन आयडी असेल. |
| **पासवर्ड** | विद्यापीठाकडून शुल्क प्राप्त झाल्यानंतर यशस्वी संस्थेकडून ईमेलद्वारे पासवर्ड देण्यात येईल. |
| **नोंदणी/ प्रवेश** | विद्यापीठाच्या खालील ऑनलाईन प्रवेश पोर्टलवरून प्रवेश घ्यावा.<br>https://admitlivestg.mkcl.org/applicant/#/login?client=YCMOU |
| **मूल्यमापन** | सदर शिक्षणक्रमासाठी अंतिम परीक्षा नसून प्रत्येक पाठानंतर सातत्यपूर्ण अंतर्गत मूल्यमापन असेल. |

इमरटस प्रोफेसर कविता साळुंके
डायरेक्टर, स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन

पाठ्यक्रम

| पाठ क्र. | पाठाचे शीर्षक | मुख्य मुद्दे |
|---|---|---|
| १. | जनरेटिव्ह AI ची ओळख | व्याख्या, इतिहास, उपयोग, मूल्यमापन निकष (FID, IS), GAIL (Generative Adversarial Imitation Learning) |
| २. | प्रॉम्प्ट अभियांत्रिकीची मूलतत्त्वे | प्रॉम्प्टचे प्रकार, माध्यमानुसार डिझाइन, Human-in-the-loop, Explainable AI Prompts |
| ३. | प्रभावी प्रॉम्प्ट डिझाइन | स्पष्टता, वैयक्तिकरण (Personalization), Few-shot/ Zero-shot Learning, Chaining, बहुभाषिक प्रॉम्प्ट |
| ४. | संवादात्मक प्रॉम्प्ट आणि वापरकर्ता सहभाग | दृश्य/ मौखिक प्रॉम्प्ट, अभिप्राय, UX (User Experience), Reinforcement Learning |
| ५. | Excel मधील प्रॉम्प्ट अभियांत्रिकी | डेटा विश्लेषण, नैसर्गिक भाषेतील प्रश्न (Natural Language Queries), BI (Business Intelligence) स्वयंचलन |
| ६. | कार्यालयीन प्रशासनासाठी जनरेटिव्ह AI | प्रशासनिक कामांचे स्वयंचलन, दस्तऐवज तयार करणे, नैतिक AI वापर |
| ७. | माध्यम आणि संप्रेषण क्षेत्रातील उपयोग | पत्रकारितेचे स्वयंचलन, जनसंपर्क (PR), कथा सांगणे, भावना विश्लेषण (Sentiment Analysis) |
| ८. | भाषाविषयक करिअरमधील वापर | भाषांतर, भाषा शिक्षण, उच्चार सुधारणा, भाषाशास्त्रीय विश्लेषण |
| ९. | सामाजिकशास्त्रे व मानवशास्त्रातील वापर | ऐतिहासिक संशोधन, आभासी संग्रहालये (Virtual Museums), सामाजिक कार्याचे अनुकरण (Simulations) |
| १०. | नैतिकता आणि जबाबदारीने AI चा वापर | पक्षपात (Bias), न्याय (Fairness), चुकीची माहिती (Misinformation), बौद्धिक संपदा/ कॉपीराइट (IP/ Copyright), माध्यम साक्षरता |
| ११. | AI सह करिअर विकास | नोकरी (Job Roles), डिजिटल पोर्टफोलिओ, कला शाखेतील कौशल्यांचे AI करिअरमध्ये रूपांतर |

## परिशिष्ट १२ :  अंतिम परीक्षा : प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

**वेळ : ३ तास** **गुण ८०**

---

**सर्वसाधारण सूचना**

१. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
२. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
३. प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
४. प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर ७५-१०० शब्दांत लिहा.

---

**प्रश्न १. खालीलपैकी कोणतेही चार उप-प्रश्न सोडवा.** **(गुण २०)**

(अ) ____________________
(ब) ____________________
(क) ____________________
(ड) ____________________
(इ) ____________________

**प्रश्न २. खालीलपैकी कोणतेही चार उप-प्रश्न सोडवा.** **(गुण २०)**

(अ) ____________________
(ब) ____________________
(क) ____________________
(ड) ____________________
(इ) ____________________

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणतेही चार उप-प्रश्न सोडवा.** **(गुण २०)**

(अ) ____________________
(ब) ____________________
(क) ____________________
(ड) ____________________
(इ) ____________________

**प्रश्न ४. खालीलपैकी कोणतेही चार उप-प्रश्न सोडवा.** **(गुण २०)**

(अ) ____________________
(ब) ____________________
(क) ____________________
(ड) ____________________
(इ) ____________________

## परिशिष्ट १३: शिक्षणक्रमाचे वेळापत्रक — शैक्षणिक वर्ष- २०२५-२६

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| **अ.** | **प्रवेश प्रक्रिया** | |
| ०१ | ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू | जून २०२५ |
| ०२ | ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया समाप्त | जुलै २०२५ |
| **ब.** | **अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन** | |
| ०३ | उद्बोधन सत्र | ऑगस्ट २०२५ |
| ०४ | स्वं-अध्ययन साहित्य वितरण | सप्टेंबर २०२५ |
| ०५ | समंत्रण सत्रे | जून २०२५ ते फेब्रु २०२६ |
| ०६ | स्वाध्याय/ गृहपाठ प्रश्न विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध | नोव्हेबर २०२५ |
| ०७ | स्वाध्याय/ गृहपाठ प्रश्न सादर करणे / प्रात्यक्षिक परीक्षा | डिसेंबर २०२५ |
| **क.** | **परीक्षा प्रक्रिया** | |
| ०८ | अंतिम परीक्षेस सुरवात | एप्रिल-मे २०२६ |
| ०९ | अंतिम परीक्षेच्या शेवटच्या दिवसापासून ४५ दिवसात निकालाची घोषणा | |
| १० | वार्षिक दीक्षांत समारंभ | जून २०२६ |

* वेळापत्रकात विद्यापीठ / शासन / विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी बदल होऊ शकतो.